# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३२० - २३** **दिनांक : - १८/०९/२०२३**

## गणेशोत्सव बंदोबस्ताकरिता मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस सज्ज.

दिनांक १९/०९/२०२३ ते २८/०९/२०२३ दरम्यान साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवच्या दृष्टीने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीसांकडून पुर्वतयारी करण्यात आलेली आहे. गणेश मंडळाचे सद्स्य, मूर्तीकार, ध्वनीक्षेपकाचे मालक यांच्यासोबत महानगरपालिका, अग्निशमन विभाग, विदयुत पुरवठा विभाग यांचे समन्वयाने बैठका घेण्यात आलेल्या आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षत्रात एकुण १३४३ सार्वजनिक व ५१५२२ खाजगी गणेश उत्सव मंडळे आहेत.

पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये एकुण सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ व खाजगी गणेशोत्सव मंडळ यांचे पोलीसांच्या वतीने मिटींग १०६ घेण्यात आलेल्या आहेत.तसेच पोलीस स्टेशन स्तरावर कॉर्नर मीटीग आयोजीत करण्यात आल्या आहेत. सदर मिटींग दरम्यान गणेश मंडळाचे सदस्य, स्थानिक व्यापारी व नागरीकांशी पोलीसांनी संवाद साधून गणेशोत्सवादरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच मागील गणेशोत्सवादरम्यान गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तींवर योग्य ती कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. ध्वनीक्षेपण कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी घेवून त्यासाठी खास पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

सर्व पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात स्थानिक ३ पोलीस उप आयुक्त,६ सहा पोलीस आयुक्त, २७३ पोलीस अधिकारी व १०८६ अंमलदार, ३ दंगा नियंत्रण पथके, बाहेरुन मागवण्यात आलेला राज्य राखीव पोलीस दल ची १ कंपनी, नवप्रविष्ट पोलीस अंमलदार १०० पुरुष व १०० महिला तसेच होमगार्ड २०० यांचा योग्य तो बंदोबस्त संबंधीत पोलीस उपआयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली लावण्यात आलेला आहे.तसेच गणेशोत्सवादरम्यान वाहतुक सुरळीत राहण्यासाठी १ पोलीस उप आयुक्त,१ सहा.पोलीस आयुक्त, १४ पोलीस अधिकारी, १९२ पोलीस अमंलदार व २४८ ट्रफिक वार्डन कार्यरत आहेत.गणेशोत्सवादरम्यान शहरामध्ये सामाजिक माध्यमातून संदेश प्रसारित (व्हायरल) समाजात तेढ निर्माण होणार नाही यासाठी सायबर सेलची पथक तैनात करण्यात आली आहे. तसेच गणेशात्सोवदरम्यान एखादा अनुचित किंवा संशयीत प्रकार नागरिकांचे लक्षात आल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे किंवा पोलीस आयुक्तालयाचे नियंत्रण कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२२-३५००६१३०, २९४५२१३५ व ७०२१९९५३५२ या क्रमांकावर संपर्क साधण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

**----0000----**